साप्ताहिक
# विश्वनायक
Email: vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
VISHVANAYAK
Mo.8686888898

■ बीड (महाराष्ट्र) ■ साप्ताहिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०१ ■ अंक - २४ ■ मंगळवार दि.९ जून २०२६ ■ पीआरजीआय रजि.नं.- एमएचबीआयएल/२५/ए४९८० ■ किंमत २ रू. ■ पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Weekly ■ BILINGUAL ■ Year - 01 ■ Issue - 24 ■ Tuesday Dt. 9 June 2026 ■ PRGI.REG.No. MHBIL/25/A4980 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

## नवविवाहितेचा विहीरीत आढळला मृतदेह

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुटेवाडी येथे एका २३ वर्षीय नवविवाहितेचा विहीरीत मृतदेह आढळल्याची घटना सोमवार (दि.८) रोजी रात्री आढळून आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दरम्यान विवाहीतेचा मृतदेह जिल्हा रूग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला असून सदरील प्रकार खूनाचा असल्याचा आरोप करत या प्रकरणातील सासरच्या लोकांना जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत शवविच्छेदन होऊ देणार नाहीत अशी भुमिका मयत विवाहीतेच्या माहेरकडील लोकांनी घेतली आहे.
बीड तालुक्यातील कुटेवाडी येथील संध्या पवन कुटे (वय २३) या विवाहीतेचा मृतदेह सोमवार (दि.८) रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास परिसरातील विहीरीत आढळून आला. मयत विवाहीतेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रूग्णालया आणण्यात आला असून या घटनेनंतर सासरकडील एकही व्यक्ती जिल्हा रूग्णालयाकडे फिरकला सुध्दा नव्हता. विवाहीतेच्या माहेरकडील नातेवाईकांनी मात्र सासरच्याच लोकांनी तिचा खून केल्याचा आरोप केला आहे. जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत शवविच्छेदन होऊ देणार नाही अशी भुमिका नातेवाईकांनी घेतल्याने जिल्हा रूग्णालय परिसरात काही वेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या चार पोलीस अधिकाऱ्यांसह दहा कर्मचारी जिल्हा रूग्णालय परिसरात थांबून आहेत. दुपारी उशिरापर्यंत प्रकरणाची कार्यवाही सुरु होती.

# तोहीद खानच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाल्याशिवाय स्वस्त बसणार नाही : समीर साजिद बिल्डर

## तोहीद खानच्या परिवाराच्या पाठीमागे एमआयएम पक्ष खंबीर पणे उभा : ॲड.शेख शफीक (भाऊ)

### खा बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब, प्रदेश अध्यक्ष मा खा इम्तियाज जलील साहेब यांच्या आदेशानुसार समीर साजिद बिल्डर आणि ॲड शेख शफीक भाऊ यांनी परळी येथे मरहुम तोहीद खान यांच्या परिवाराची घेतली भेट



### मरहुम तोहीद खान यांच्या परिवाराला एआयएमआयएम पक्षातर्फे एक लाख रुपये देण्याची घोषणा : समीर साजिद बिल्डर यांनी केली

**बीड । प्रतिनिधी**

मागील सात दिवसापुर्वी परळी येथील तोहिद खान यांचा खून करण्यात आला होता. या खूनाला आत्महत्याचे स्वरूप देण्यासाठी तोहिद खान यांची बॉडी रेल्वे ट्रॅकवर ठेवून मारेकऱ्यांनी पळ काढला होता. पण वायरल ऑडिओ क्लिपमुळे हे सर्व कट कारस्थान कशा पध्दतीने रचण्यात आले, तोहिदचा खून कोणी केला, कुठे केला, कशासाठी केला याचा खुलासाच या ऑडिओ मध्ये मारेकऱ्यांनी केला. पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन आरोपींना जेरबंद केले. पण हे हत्या प्रकरण दोन लोक करु शकत नाही या प्रकरणात दोन पेक्षा जास्त आरोपी असु शकतात अशी चर्चा आहे.
मागील सात दिवसापासून बीड सह परळीमध्ये या विषयी आंदोलन सुरू असून काल -खचखच् प्रदेश सरचिटणीस तथा औरंगाबाद महापालिका विरोधीपक्षनेते समीर साजिद बिल्डर व -खचखच् बीड जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक यांनी आरोपींना कडक शासन करण्याची व या प्रकरणात एक वळण मिळाले आहे आरोपी ऑडिओ क्लिप मध्ये मुस्लिम समाजाचे पवित्र धार्मिक स्थळ मस्जिद उडविण्याचे भाषा बोलत आहे. यामुळे अशी मागणी करण्यात येत आहे की आरोपींना ण-झ- व मोक्का अंतर्गत तसेच हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा व पिडित परिवाराला न्याय मिळावा यासाठी हि मागणी केली आहे. तसेच या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून यामारेकऱ्यांना मदत करणाऱ्यांचा शोध घेण्याचीही मागणी त्यांनी केली होती.
मारेकऱ्यांनी जे ऑडिओ क्लिप व्हायर केली त्यात एका समाजाला टार्गेट करण्यात आल्याचे दिसून येते. आज परळी येथे जावून समीर साजिद बिल्डर व शफीक भाऊ यांनी मयत कुटूंबियांची भेट घेतली. मयत तोहिद खान यांचे बंधू बन्ने खान, मुलगा आणि मुलगी यांचीही भेट घेवून त्यांचे सांत्वन केले. त्यांनी मयत तोहिद यांच्या कूटूंबियांना आश्वासन दिले की जो पर्यंत तोहिद यांना मारहाण करणारे आणि त्यांना मदत करणाऱ्यांना कडक शासन होत नाही तो पर्यंत याचा पाठपुरावा मी करणार असल्याचे सांगितले. परळी येथील काही नागरीकांचीही भेट त्यांनी घेतली त्यांच्याकडून ही सविस्तर माहिती जाणून घेत पुढील न्यायालयीन लढाई मोठ्या विधीतज्ञाच्या मार्गदर्शनाखाली लढली जाई असे ही त्यांनी सांगितले.



### तोहिद खान कुटुंबाशी इम्तियाज जलील यांचा फोनवर संवाद असदुद्दीन ओवैसी आवाज उठवणार : इम्तियाज जलील

परळी येथील तोहिद खान मृत्यू प्रकरणात माजी खासदार इम्तियाज जलील साहेब यांनी पीडित कुटुंबीयांशी फोनवरून संवाद साधला. यावेळी त्यांनी कुटुंबीयांचे सांत्वन करत न्यायासाठी लढ्यात (AIMIM²) पक्ष त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचे सांगितले. तसेच पक्षाचे अध्यक्ष खा बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब हे या प्रकरणाची दखल घेत असून लोकसभेत हा मुद्दा उपस्थित करून न्यायाची मागणी करणार असल्याची माहिती इम्तियाज जलील यांनी दिली. या संवादामुळे पीडित कुटुंबाला दिलासा मिळाला असून न्यायाच्या अपेक्षा अधिक बळावल्या आहेत.
यावेळी मुफ्ती अश्फाक साहेब, बीड जिल्हा अध्यक्ष ॲड शेख शफीक भाऊ, नगरसेवक काका साहेब काकडे, वाजेद जागिरदार, सय्यद इलियास, मोमीन अजहर सय्यद सैफअली, नगरसेवक शेख मोहसिन, मा युवक शहराध्यक्ष शेख अन्वर, शेख शरीफ, जमील अध्यक्ष, तालेब इनामदार, अजीम दादा, शाकेर भाई, माजेद इनामदार सायगाव सय्यद रईस, शेख मुदस्सीर, गफ्फार शाह, अश्फाक भाई, सोहेल शिकलकर आदी उपस्थित होते.

## कारवाईचे पोकळ दावे बंद करा; 'देवेंद्रभाऊ', जरा 'आबां'चा आदर्श घ्या! : करूणा मुंडे

### माफियांना उमेदवारी अन् पोलिसांचा बळी; पुणे दारू बळी प्रकरणावरून करुणा मुंडे कडाडल्या!

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातील अवैध दारू विक्री प्रकरणामुळे काही निष्पाप नागरिकांना आपला जीव गमावावा लागला आहे. यावरून आता राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर विरोधक आणि सामाजिक संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. स्वराज्य शक्ती सेनेच्या प्रमुख करूणा मुंडे यांनी याप्रकरणी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत धारदार शब्दांत निशाणा साधला असून, नेहमी पोलिसांवर खापर फोडून खऱ्या राजकीय गुन्हेगारांना आणि माफियांना कधीपर्यंत वाचवणार? असा जळजळीत सवाल केला आहे.या संदर्भात करुणा मुंडे यांनी प्रसिद्धीपत्रक आणि माध्यमांद्वारे आपली भूमिका मांडताना थेट गृहमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवरच बोट ठेवले आहे.
करूणा मुंडे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात किंवा पुण्यात जेव्हा-जेव्हा एखादी मोठी आणि गंभीर घटना घडते, तेव्हा मुख्यमंत्री आणि गृहमंत्री माध्यमांसमोर येऊन 'आम्ही दोषींवर कठोर कारवाई करू' असे ठोकताळे आश्वासन देतात. मात्र, हे पोकळ आश्वासन केवळ जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी आहे का? हे आश्वासन सत्र आणखी किती दिवस चालणार, असा जाब त्यांनी विचारला आहे.गृहमंत्र्यांवर गंभीर आरोप करताना मुंडे म्हणाल्या,राज्यात ड्रग्ज माफिया, दारू माफिया, चरस, गांजा, अफू विकणारे आणि मोठे गुंड मोकाट फिरत आहेत. इतकेच नव्हे तर, ज्या माफियांना तुम्ही नगरपालिकेत आपल्या पक्षाकडून उमेदवारी दिली, त्यांच्यावर तुम्ही कधी कारवाई करणार? आपल्या राजकीय स्वार्थासाठी आणि पक्षाच्या चेल्या-चपाट्यांना वाचवण्यासाठी संपूर्ण यंत्रणा राबवली जात आहे. प्रत्येक घटनेनंतर केवळ पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन करून किंवा त्यांच्यावर 'छप्पर फोडून' मूळ गुन्हेगार आणि माफियांचे राज्य जिवंत ठेवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. चुका राजकीय नेत्यांच्या आणि बळी मात्र पोलिसांचा, हे राजकारण आता थांबले पाहिजे,असा इशारा त्यांनी दिला आहे.

### 'आर. आर. पाटील (आबा) यांचा आदर्श घ्या!'

**स्वराज्य शक्ती सेनेच्या वतीने करुणा मुंडे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिवंगत गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा) यांच्या कामाची आठवण करून दिली. त्या म्हणाल्या की, जर महाराष्ट्राला खरोखरच सुरक्षित करायचे असेल, तर एक सक्रिय आणि तडफदार गृहमंत्री म्हणून आर. आर. पाटील आबांचा काहीतरी आदर्श घ्या. आबांनी कधीही गुन्हेगारांची राजकीय पाठराखण केली नाही.शेवटी, आपल्या राजकीय फायद्यासाठी पोलिसांचा बळी देणे बंद करा आणि मुख्य गुन्हेगारांना जेलच्या हवेत पाठवा, अशी नम्र व तितकीच कडक विनंती स्वराज्य शक्ती सेनेच्या वतीने करुणा मुंडे यांनी केली आहे. या पत्राने आता राज्यातील राजकीय वातावरण आणि गृहखात्यासमोरील अडचणी अधिक वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

## परळीत २६ किलो गांजासह पावणेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटकेत



**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेने परळीमध्ये अंमली पदार्थांच्या विरोधात एक मोठी आणि धडक कारवाई केली आहे. परळी येथील रामनगर भागात एका घरावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल २६ किलो २५८ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.
मंगळवारी (दि. २ जून) दुपारी ४:३० वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने परळीतील रामनगर भागात राहणारा संशयित राहुल राजू मोहिते (वय २६ वर्षे) याच्या घरावर अचानक छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना घरात लपवून ठेवलेला २६ किलो २५८ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह एकूण ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी राहुल मोहिते याच्याविरुद्ध परळी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही कारवाई बीड एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखालील पोलिस निरीक्षक रघुनाथ नाचन, उपनिरीक्षक दीपक राठोड, सफौ बालाजी दराडे, अंमलदार रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, प्रल्हाद भताने, पुरुषोत्तम काळे, शीतल घुगे, पंडित पांचाळ, कैलास कोलमवाड, शुभम घुले आणि महिला पोलीस अंमलदार भोसले आदींनी केली.

## कॅरेक्टर खराब करण्याची धमकी देणारा पोलिस अंमलदार बळवंत 'लाचखोर' निघाला!

### शेतकऱ्याला धमकावणारा पोलीस अंमलदार १० हजारांची लाच घेताना रंगेहाथ गजाआड!

**नेकनूर । प्रतिनिधी**



तुझं कॅरेक्टर खराब करून टाकीन! अशी गर्जना करत एका गरीब शेतकऱ्याला सत्तेची मस्ती दाखवणाऱ्या खाकी वर्दीचा बुरखा अखेर फाटला आहे.
बीड जिल्ह्यातील लाचखोरीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत असतानाच, दिनांक ६ मे रोजी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नेकनूर पोलीस ठाण्यात एक मोठा धमाका केला. शेतकऱ्यांना दमदाटी करणाऱ्या बळवंत नावाच्या पोलीस अंमलदाराला १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.
'दुसऱ्याचे कॅरेक्टर खराब' करण्याची धमकी देणाऱ्या या पोलिसाचे स्वतःचेच 'कॅरेक्टर' आता चव्हाट्यावर आल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, एका प्रकरणातील कायदेशीर काम करून देण्यासाठी पोलिस अंमलदार बळवंत याने तक्रारदाराकडे १० हजार रुपयांची थेट मागणी केली होती. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट जालना एसीबीकडे धाव घेतली.तक्रार दाखल होताच जालना एसीबीचे उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने शनिवारी (दिनांक ६ जून) दुपारी नेकनूर पोलीस ठाण्याच्या परिसरातच सापळा रचला. लाचखोर अंमलदाराने जशी १० हजारांची रक्कम हातावेगळी केली, तसाच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याच्यावर झडप घातली आणि त्याला रंगेहाथ बेड्या ठोकल्या. या धडक कारवाईमुळे लाचखोर पोलिसांचे धाबे दणाणले आहेत.अटक करण्यात आलेला हा पोलीस अंमलदार पहिल्यापासूनच वादग्रस्त राहिला आहे. काही महिन्यांपूर्वी शेतीच्या वादातून एका गरीब शेतकऱ्याला तुझं कॅरेक्टर खराब करून टाकीन, गुन्हे अंगावर पाडीन अशी उघड धमकी देतानाचा याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला होता. त्यावेळी खाकीच्या जोरावर माज करणाऱ्या या कर्मचाऱ्याला आज कायद्याने त्याची खरी जागा दाखवून दिली आहे.

### पोलीस दलाची लक्तरे वेशीवर!

**या कारवाईनंतर आरोपी अंमलदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास एसीबी करत आहे. पण या कारवाईमुळे नेकनूर पोलीस ठाण्याचा कारभार आणि बीड जिल्हा पोलीस दलाची लक्तरे पुन्हा एकदा वेशीवर टांगली गेली आहेत.सर्वसामान्यांना न्याय देण्याऐवजी स्वतःचे खिसे गरम करणाऱ्या आणि गरिबांना धमकावणाऱ्या अशा 'कॅरेक्टरलेस' पोलिसांवर आता खात्यानेही कठोर बडगा उचलावा, अशी मागणी जनतेतून होत आहे.**

## वीज पडून बैल ठार; चिंचोटी शिवारातील घटना

**वडवणी । प्रतिनिधी**

वादळी वारा आणि विजेच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली. या दरम्यान शेताच्या गोट्या बाहेर बांधलेल्या बैलावर रात्री १० ते ११ च्या सुमारास विज पडली असून यामध्ये जागीच बैल ठार झाला असल्याची घटना चिंचोटी शिवारात घडली आहे.



रात्री वादळी वार्यासह विजेच्या कडकडाटात पावसाने जोरदार पावसाची हजेरी लावली. हा पाऊस जवळपास दहा वाजल्यापासून रात्री एक वाजेपर्यंत झाला. चिंचोटी येथील रहिवासी असणारे शेतकरी अर्जुन गोंडे यांनी शेतातील गोट्याच्या बाहेर बांधलेल्या बैलावर रात्री दहा तेअकरा वाजण्याच्या सुमारास वीज पडली.
यामध्ये बैल जागीच ठार झाला असून सदरील शेतकर्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याची माहिती तात्काळ महसूल प्रशासनाला दिल्यानंतर आज सकाळी गावचे तलाठी यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामाकरून बैलाचा मृतदेह पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला आहे. बैल दगावल्यामुळे सदरील शेतकर्याचे ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान देखील झाले आहे. शेतकर्याला तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

## माजलगावच्या बायपास रोड येथे कैकाडी महाराज चौक येथे एका युक्तीला मित्राने केली अमानुषपणे मारहाण

**माजलगाव । शेख अखिल**

मी माजलगाव च्या जिजामाता नगर मध्ये राहात आहे व माझ्यासोबत माझी आई साविञीबाई तसेच माझी पत्नी पायल यांच्यासह राहत असुन मी माजलगाव शहरामध्ये पी यु सी सेंटर चालवुन माझी व माझ्या कुटुंबाची उपजिविका भागवितो यापुर्वी मी व माझा मिञ करण परमेश्वर मेंडके रा. माजलगाव असे आम्ही दोघे माजलगाव येथे पी यु सी सेंटर चालवत होतो परंतु सध्या तो स्वताचा परभणी फाटा माजलगाव येथे अर्जुन पी यु सी सेंटर नावाचे दुकान चालवीत आहे
संभाजीनगर येथून ०३/०६/२०२६ रोजी मी माजलगाव येथे येणार असल्याने माझे मिञ करण परमेश्वर मेंडके रा. जिजामातानगर, २) विजय जीवन जाधव रा. तानाजीनगर (३) मोहन मस्के रा. तानाजीनगर ४) प्रशांत राउत रा सिरसट गल्ली माजलगाव हे मला भेटण्यासाठी आले होते तेव्हा मी सायंकाळी १६.३० वा. चे सुमारास घरी आलो असता ते सर्वजण मला भेटले तेवढ्यात मी प्लॉटच्या कामासाठी माझा आणखी एक मिञ असीम रशीद अनार रा. केसापुरी कॅम्प याला बोलावुन घेतले असता आम्ही सर्वजन सायंकाळी १७.२० वा. चे सुमारास कैकाडी महाराज चौक बायपास रोड माजलगाव येथील घेणे यांच्या चहाच्या हॉटेलवर चहा पिण्यासाठी गेले असता



सदर ठिकाणावरुन विजय जाधव, मोहन मस्के, प्रशांत राउत तेथुन निघुन गेले असता करण परमेश्वर मेंडके मला म्हणाला की आर टी ओ विघ्ने साहेब यांना मी बनावट पी यु सी तयार करत आहे अशी माहीती तु का दिलीस तेव्हा मी त्याला म्हणालो की सदरची माहीती मी दिली नाही तेव्हा त्याने मला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व विजय, मोहन, प्रशांत, यांना लाकडी दांडे हॉकी व धार धार शास्ञाने घेवून येण्यास सांगितले व त्यांनी लाकडी दांडे हॉकी धार धार हत्यार आणल्यानंतर क्रण परमेश्वर मेंडके यांने मोहन मस्के याच्याकडुन लाकडी दांडा दोघांनी हॉकी व एकाने हत्याराने व एकाने स्वतःच्या कमराच्या बेल्टाने मला मारहाण करण्यास सुरुवात केली व माझे डाव्या कानावर धारदार हत्यार ने मारून मला दुखापतीमुळे माझा कान नावावरती तीन ते चार टाके पडले आहे तसेच विजय जाधव, मोहन मस्के व प्रशांत राउत यांनी सुध्दा माझ्या उजव्या पायावर, उजव्यापायाच्या गुडघ्यावर व डाव्या हाताच्या मनगटावर लाकडी दांड्याने व हाकी बेल्टने मारहाण केल्यामुळे माझ्या पायाला हाताला कमरेला पाठीला मुका मार लागला आहे तेव्हा माझा मिञ असीम आतार व इतर चहा पिणाऱ्या लोकांनी आमच्या भांडणाची सोडवासोडव केली आहे.
तरी दि ०३/०६/२०२६ रोजी सायंकाळी १७.२० वा. चे सुमारास कैकाडी महाराज चौक माजलगाव येथे घेणेच्या हॉटेलवर चहा पिण्यासाठी गेलो असता करण परमेश्वर मेंडके यांने माझे डावे कानावर हत्याराने व हॉकी बेल्ट लाकडे दांड्याने मारुन डाव्या पायावर व डाव्या हातावर मारुन मुक्का मार दिला म्हणून माझी सदर इसमाविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे व सदरचा दुखापत केली तसेच विजय जाधव, मोहन मस्के, प्रशांत राउत सर्व रा. माजलगाव यांनी हॉकी बेल्ट लाकडी दांड्याने धार धार हत्याराने तसेच मला व माझ्या परिवाराला जीव मारण्याची धमकी पण या सर्वांनी दिली आहे. तसेच सदर आरोपी करण मेंडके यांच्या विरोधात बनावट झ ण उ प्रमाणपत्र दिल्याने ३२० अंतर्गत बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कारवाही पण चालू आहे.

## माजलगाव शहर जवळ असलेल्या भाटवडगाव येथे घरफोडी

**माजलगाव । शेख अखिल**

तालुक्यातील भाटवडगाव परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी घरफोडी करत करत सोन्याचे सं दागिने व रोख रक्कम असा २ लाख ७ हजार चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दागिन्यासह रोख रक्कम २ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज लंपास ऐवज लंपास

यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार दि.४ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यापासून ते दि. ५ जून २०२६ रोजी दुपारी ४.३० वाजेच्या दरम्यान ही चौरीची घटना घडली. भाटवडगाव येथील पूर्वा जिनिंगजवळील घराला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य केले. घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी घराच्या दरवाज्याचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला.
यानंतर घरातील कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण २ लाख ७ हजार रुपये चोरून नेले. चोरीची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. फिर्यादी बाळासाहेब रोडगे यांच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १८७/२०२६ अन्वये कलम ३०५ (अ), ३३१ (३) व ३३१ (४) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साप्ताहिक विश्वनायक






# यंदा देशात नेमका किती पाऊस पडणार?

४ जून रोजी केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाचे (मान्सून) अधिकृत आगमन झाले. त्यानंतर ८ जूनला दक्षिण मध्य महाराष्ट्रात मान्सून दाखल झाल्याची घोषणा करण्यात आली. मात्र, पावसाला सुरुवात होण्याआधीच भारतीय हवामान खात्याने आपल्या अंदाजात पुन्हा बदल केला. त्यानुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के इतका हंगामी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली. विशेष बाब म्हणजे, यावर्षीच्या सुरुवातीला हवामान विभागाने देशात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तवला होता. यादरम्यान नव्या अंदाजात दोन टक्के कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली. देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के इतका हंगामी पाऊस पडण्याची शक्यता आहे. यापूर्वी आम्ही हा अंदाज ९२ टक्के वर्तवला होता; परंतु आता तो ९० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे देशात एकूणच सरासरीपेक्षा कमी पाऊस होईल, अशी माहिती पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम. रविचंद्रन यांनी एका पत्रकार परिषदेत दिली. त्यांच्या या घोषणेनंतर दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के पाऊस म्हणजे नेमके काय? प्रत्येक राज्यात नेहमीपेक्षा १० टक्के कमी पाऊस पडणार का? सामान्यपेक्षा कमी मान्सून म्हणजे दुष्काळाची स्थिती निर्माण होणार का? असे विविध प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहेत. तज्ज्ञांच्या मते, या सर्व प्रश्नांचे उत्तर थोडक्यात नाही असे आहे. भारतीय हवामान विभागाने यंदाच्या मान्सून हंगामात देशात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी त्याचा अर्थ प्रत्येक भागात १० टक्के कमी पाऊस पडेल असा होत नाही. देशभरातील सरासरी पावसाचा अंदाज हा राष्ट्रीय स्तरावरील एकत्रित आकडा असतो. त्यामुळे काही भागांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडू शकतो, तर काही ठिकाणी कमी पाऊस होण्याची शक्यता असते. याबाबत स्वतंत्र हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी सांगितले की, बहुतेक शेतकऱ्यांना आपल्या परिसरात नेहमीप्रमाणेच पाऊस पडेल अशी अपेक्षा असते. मात्र स्थानिक हवामानातील बदल आणि प्रादेशिक घटकांचा विचार करणे गरजेचे आहे. हे घटक अंदाजापेक्षा पावसाचे प्रमाण कमी किंवा अधिक करू शकतात. ते पुढे म्हणाले की, भारत हा विविध सूक्ष्म हवामान वैशिष्ट्यांनी समृद्ध असा विशाल देश आहे. त्यामुळे पावसाच्या प्रमाणात मोठे स्थानिक फरक दिसून येणे स्वाभाविक आहे. भारतीय हवामान विभागाच्या ताज्या अहवालातही यंदाच्या मान्सूनबाबतचा अंदाज स्पष्टपणे दिसून येतो. ईशान्य भारतात सामान्य पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र मध्य भारत, उत्तर-पश्चिम भारत आणि दक्षिण द्वीपकल्पातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याशिवाय खरीप पिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या मान्सून कोअर झोनमध्येही पर्जन्यमान सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या दृष्टीने यंदाचा मान्सून विशेष महत्त्वाचा ठरणार आहे. हवामान खात्याने पावसाचे वर्गीकरण करण्यासाठी ठरवलेल्या श्रेणी समजून घेणे थोडे गुंतागुंतीचे ठरते. आयएमडीच्या निकषांनुसार, दीर्घकालीन सरासरीच्या ९६ ते १०४ टक्के दरम्यान होणारा पाऊस 'सामान्य' मानला जातो, तर ९० ते ९५ टक्के दरम्यानचा पाऊस 'सामान्यपेक्षा कमी' या श्रेणीत येतो. त्याशिवाय ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्यास तो 'तुटीचा' मानला जातो. यंदाचा ९० टक्क्यांचा अंदाज हा नेमका 'सरासरीपेक्षा कमी' आणि 'अपुरा पाऊस' या दोन्ही श्रेणींच्या सीमारेषेवर आहे. यंदाचा नैऋत्य मान्सून 'तुटीचा' ठरण्याची ६० टक्के शक्यता असल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. म्हणजेच पावसाचा मुख्य अंदाज जरी सरासरीच्या ९० टक्के असला, तरी यंदाचा हंगामी पाऊस ९० टक्क्यांच्या उंबरठ्याखाली घसरून तुटीच्या श्रेणीत जाण्याची दाट शक्यता आहे. हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी स्पष्ट केले की, सामान्यपेक्षा कमी पाऊस म्हणजे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी असेल, मात्र त्याचा फार मोठा परिणाम होईलच असे नाही. यापूर्वीही भारताने कमी पावसाचे मान्सून अनुभवले असून त्यातून थेट देशव्यापी दुष्काळ निर्माण झालेला नाही. मान्सूनचा प्रत्यक्ष परिणाम अनेक घटकांवर अवलंबून असतो. त्यामध्ये पावसाची तूट नेमक्या कोणत्या भागात आहे, संपूर्ण हंगामात पाऊस कसा आणि किती पडतो, धरणांमधील पाणीसाठा आणि स्थानिक पातळीवरील पाण्याची उपलब्धता यासारख्या अनेक घटकांचा समावेश होतो. राष्ट्रीय स्तरावर पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असले तरी अनेक प्रदेशांमध्ये पुरेसा पाऊस पडू शकतो. याउलट, जर पाऊस काही मोजक्याच आणि अतिवृष्टीच्या स्वरूपात झाला, तर त्यामुळे वेगळ्याच प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. याच कारणामुळे हवामान तज्ज्ञ केवळ एकाच हंगामी अंदाजाला जास्त महत्त्व न देण्याचा सल्ला देतात. नैऋत्य मोसमी पाऊस हा चार महिन्यांचा असतो आणि या प्रदीर्घ कालावधीत हवामानाच्या परिस्थितीत मोठे बदल होऊ शकतात. मान्सूनचा हंगाम जसा पुढे सरकतो, तसे समुद्राचे तापमान, वातावरणीय चक्र आणि प्रादेशिक हवामान यंत्रणा सातत्याने बदलत असतात. दरम्यान, हवामान विभागाने येत्या दोन ते तीन दिवसात मोसमी पावसाचे वारे आणखी पुढे सरकेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. प्रत्यक्षात पुढील काळात पावसाचा जोर कमी होण्याची, तापमान वाढण्याची आणि मोसमी पावसाच्या प्रगतीचा वेग मंदावण्याची शक्यता आहे. पेरणीसाठी हा निर्णायक काळ आहे आणि अशावेळी मोसमी पावसाची घोषणा करण्यात आली. त्यानुसार पेरणी झाली आणि मग त्यानंतर पाऊस थांबला आणि तापमानात वाढ झाली, तर त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसू शकतो, असेही हवामान संशोधकांचे म्हणणे आहे. हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांनी सांगितले की, आयएमडीचे हंगामी अंदाज, मासिक आढावा आणि पावसाच्या मोठ्या घडामोडींबाबत सातत्याने अपडेट राहिल्यास हवामानाचा नेमका अंदाज येण्यास मदत होते. साप्ताहिक पावसाच्या अहवालावरून मान्सून 'सक्रिय टप्प्यात' प्रवेश करत आहे की नाही हे स्पष्ट होते. सक्रिय टप्प्यात पाऊस सर्वदूर कोसळतो; तर मान्सूनच्या विश्रांतीच्या टप्प्यात तो तात्पुरता कमकुवत होतो. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हे अल्पमुदतीचे अंदाज अनेकदा संपूर्ण हंगामाच्या अंदाजापेक्षा जास्त उपयुक्त आणि महत्त्वाचे ठरतात, असेही शेट्टी यांनी स्पष्ट केले.

## गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करा; कत्तलखाने व मांस निर्यात बंदीची मागणी

# शेतकऱ्यांचे अर्थकारण आणि सामाजिक-धार्मिक सलोखा जपण्यासाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

### डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखालीआंदोलन; गोमाता प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

देशहित, शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक-धार्मिक सलोखा जपण्यासाठी गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करावे, देशातील सर्व कत्तलखाने टप्प्याटप्प्याने बंद करावेत, विदेशात होणाऱ्या मांस निर्यातीवर संपूर्ण बंदी घालावी तसेच गोवंश संरक्षणासंदर्भातील कायद्यांची निष्पक्ष अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागण्यांसाठी येत्या सोमवारी (दि. ८ जून) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक श्री. बाजीराव ढाकणे यांनी दिली.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत भारताचे पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात येणार आहे. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, भारतीय संस्कृतीत गाईला विशेष धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक महत्त्व असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय आणि सेंद्रिय शेतीच्या दृष्टीने गोवंशाचे संवर्धन आवश्यक असल्याने या विषयावर केंद्र शासनाने व्यापक राष्ट्रीय धोरण जाहीर करावे, अशी मागणी करण्यात येणार आहे. निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, गोवंश हत्याबंदी



कायद्याच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी सामाजिक तणाव निर्माण होण्याच्या घटना समोर येतात. अशा घटनांमुळे समाजात अविश्वासाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असून, कोणत्याही समाजघटकाला लक्ष्य न करता संविधान आणि विद्यमान कायद्याच्या चौकटीत समान व निष्पक्ष न्याय मिळणे आवश्यक आहे. तसेच मांस व्यवसाय आणि मांस निर्यात क्षेत्रात कार्यरत मोठ्या उद्योगांसाठीही एकसमान धोरण लागू करून शासनाने पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करत पशुधन व्यवस्थापन, गोसंवर्धन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे दीर्घकालीन धोरण राबविण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

सामाजिक सलोखा, कायद्याचे राज्य आणि सर्व नागरिकांना समान न्याय या मूलभूत तत्त्वांच्या आधारे शासनाने या विषयावर सर्वसमावेशक चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा, या उद्देशाने हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. येत्या सोमवारी होणाऱ्या या निदर्शनात बीड जिल्ह्यातील गोमाता प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक श्री. बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

## तोहीद खानच्या परिवाराला न्याय द्या, आरोपींना फाशी द्या : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यात दररोज कुठे ना कुठे खुणाचे प्रकार घडत आहे. आणि काही ठिकाणी जातीय द्वेषातुन मुस्लिम समाजाला टार्गेट करण्याचे काम होत आहे. अशीच एक घटना परळी येथे घडली आहे. याच्या मास्टर माईंड कोण आहे यांचे शोध घेणे खुप गरजेचे आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शेख युनुस यांनी प्रशासनाला विनंती केली आहे.

जिल्हातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात तोहीद खान यांच्या हत्येने जिल्हासह संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. मृतदेहावरील गंभीर जखमा, मारहानिच्या खुना आणि नंतर समाज माध्यमांवर व्हायरल झालेल्या आडिओ क्लिप मुळे या प्रकरणात अनेक संशय निर्माण झालेली आहे. तोहीदच्या अंगावर जखमा पाहता त्याच्यावर अत्याचार अमानुष पणे झाल्याचे दिसून येत आहे.

सोशल मीडियावर जी क्लिक व्हायरल झाली त्या क्लिपची सकल चौकशी झाली पाहिजे. तिच्या माध्यमातून खूप काही बाहेर येऊ शकेल. त्या जातीय द्वेषातुन खून केल्याचा उघड उघड समोर येत आहे. त्यामुळे दोन आरोपीला पकडून समाधानी न होता,त्यांच्या मागे मुख्य सूत्रधार कोण आहे. याला पकडणे सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. माजी पोलीस प्रशासनाला विनंती आहे की, त्यांनी लवकरात लवकर तोहीद खान याला व त्याच्या परिवाराला न्याय द्यावा. आणि आरोपींना कठोर शिक्षा व्हावी हीच अपेक्षा मी प्रशासनाकडे करीत आहे.

## खाजगी संघटनांच्या कार्यालयांतून किचन किट वाटप?

### बीड कामगार विभागावर महाघोटाळ्याचा आरोप

#### किचन किट व संदूक वाटपातील भ्रष्टाचारांची चौकशी करा; अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा – पँथर प्रेम कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या किचन किट व संदूक वाटप योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप दलित पँथर युवक जिल्हाध्यक्ष तथा कामगार नेते प्रेम धर्मेंद्र कांबळे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी मुख्य कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी बीड आणि मुख्य कामगार अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, शासकीय नियमांनुसार बांधकाम कामगारांना साहित्य वाटप हे अधिकृत शासकीय केंद्र किंवा कामगार सुविधा केंद्रावर बायोमेट्रिक पडताळणीद्वारे होणे अपेक्षित आहे. मात्र बीड जिल्ह्यात




अनेक खाजगी असंघटित कामगार संघटनांच्या कार्यालयांमध्ये शासकीय किचन किट व संदूक वाटपाचे कॅम्प आयोजित केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कांबळे यांनी जिल्हा कामगार कार्यालयातील काही अधिकारी आणि कर्मचारी हे स्वतः खाजगी संघटनांच्या कार्यालयांमध्ये जाऊन शासकीय साहित्य वाटप करत असल्याचा दावा केला आहे. यामुळे शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत असून काही संघटनांकडून लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली कामगारांकडून अवैध पैशांची वसुली केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

तक्रारीत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून खाजगी कार्यालयांमधील सर्व वाटप कॅम्प तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच साहित्य वाटपाची प्रक्रिया केवळ शासकीय इमारतीत किंवा अधिकृत कामगार सुविधा केंद्रावरच पारदर्शक पद्धतीने राबविण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी करत प्रशासनाने सात दिवसांच्या आत कारवाई न केल्यास बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा प्रेम कांबळे यांनी दिला आहे. या तक्रारीमुळे बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार कल्याण योजनांच्या अंमलबजावणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून प्रशासन याकडे कोणती भूमिका घेते याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे.

## पाडळी येथील अन्यायग्रस्त आदिवासी कुटुंबाला आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील पाडळी येथील गायरान परिसरात राहणाऱ्या आदिवासी भिल्ल समाजातील बरडे कुटुंबावर काही समाजकंटकांनी केलेल्या हल्ल्यात शंकर बरडे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या अन्यायग्रस्त कुटुंबाची आम आदमी पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा माजी सैनिक अशोक येडे यांनी भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. महाराष्ट्र राज्य वीर एकलव्य अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष बरडे यांच्या समन्वयातून ही भेट आयोजित करण्यात आली. यावेळी कुटुंबीयांच्या अडचणी जाणून घेत त्यांना धीर देण्यात आला तसेच आवश्यक मदत साहित्यही प्रदान करण्यात आले

यावेळी बोलताना अशोक येडे यांनी सांगितले की, भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी पाडळी येथील अनेक आदिवासी कुटुंबे आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. अनेक कुटुंबांकडे स्वतःचे घर नाही, शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नाही. अशा परिस्थितीत त्यांच्यावर अन्याय व अत्याचार होत असतील तर हा अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.

या कुटुंबास न्याय मिळवून देण्यासाठी तसेच आदिवासी समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पार्टी व विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून प्रशासन दरबारी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी अंकुश बरडे (संस्थापक अध्यक्ष, बालाघाटचा एकलव्य सेवा दल, बीड), रुपेश पवार (कार्याध्यक्ष, बालाघाटचा एकलव्य सेवा दल, बीड), श्रीकांत पवार, भरत पवार, अजिंक्य बरडे तसेच इतर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सलीम अध्यक्ष यांना प्रतिष्ठित राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष सामाजिक योद्धा गौरव पुरस्कार जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**



आपल्या सामाजिक कर्तृत्वाने आणि अहोरात्र चालणाऱ्या निस्पृह जनसेवेने बीड जिल्ह्यात गोरगरिबांचे हक्काचे आधारस्तंभ ठरलेले खंबीर समाजसेवक सलीम अध्यक्ष यांना यंदाचा अत्यंत मानाचा राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष सामाजिक योद्धा गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या वतीने या सन्मानाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.


## माजलगाव पंचायत समितीत मगरे ऑपरेटरची घरकुल विभागाला मगरमिठी

### लाभार्थ्यांची पिळवणूक, अनेकांचे हप्ते थकवल्याने बाबूराव पोटभरेंनी केली निलंबनाची मागणी

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगाव पंचायत समितीच्या घरकुल विभागातील मगरे अडनावाचा ऑपरेटर बीडीओ आणि अभियंत्या पेक्षाही मोठा झाला असून, तो घरकुल धारकांचा छळ करत असून, उद्धट भाषा आणि पिळवणूक करीत आहे. अनेकांचे मागील ६ महिन्यांपासून घरकुलाचे हप्ते थकविले आहे. याप्रकरणी बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष

बाबूराव पोटभरे यांनी सीईओंकडे निवेदनाद्वारे या ऑपरेटरला निलंबित करण्यात यावे अशी मागणी केली आहे. तो स्थानिकचा रहिवासी असून, जवळपास मागील १८ वर्षांपासून तो याच ठिकाणी चिकटून बसलेला आहे. यामुळे त्याने एकप्रकारे माजलगावच्या घरकुल विभागाला मगरमिठीत घेतल्याची चर्चा रंगली आहे. माजलगाव पंचायत समितीमध्ये राजकुमार मगरे नावाचा



संगणक ऑपरेटर आहे. स्थानिक रहिवासी असल्याचा फायदा घेत सर्वपक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत या ऑपरेटरने आपल्या संबंधाचे जाळे निर्माण केलेले आहे. पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना इत्यादी घरकुलांचे मोठ्या प्रमाणात माजलगाव पंचायत समितीला उद्दिष्ट आलेले आहे. घरकुलधारक स्वतःचे काही पैसे टाकत घरकुल बांधतात, मात्र हे पैसे वसूल करतो. बांधकामाचे फोटो अनेकवेळा रिजेक्ट केले जातात. घरकुलाचे फोटो काढण्याचे कामही घरकुल इंजिनिअर करत असताना सुद्धा हे ऑपरेटर छोटे-मोठे कारण देत ऑनलाईन फोटो काढून दोन-दोन-तीन-तीन वेळा या लाभार्थ्यांना फोटो काढण्याचे बजावतात. याबाबत अनेक तक्रारीही गटविकास अधिकारी आणि बीड जिल्हा परिषदेला करण्यात आलेल्या आहेत मात्र त्याच्यावर कार्यवाही झालेली नाही. याबाबत बहुजन विकास मोर्चाच्या वतीने या संगणक ऑपरेटरवर निलंबनाची कारवाई करावी, नसता जिल्हा परिषद कार्यालयासमोर बहुजन विकास मोर्चाच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा बाबूराव पोटभरे आणि जिल्हाध्यक्ष ससाणे यांनी जिल्हा रिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांना दिलेले निवेदनात दिला आहे.

## मोकळ्या प्लॉटमध्ये गटाराचे पाणी सोडल्याने विविध आजारास निमंत्रण

### झमझम कॉलनीतील प्रकार; दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त, डेंग्यूसह विविध आजारांचा धोका

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात स्वच्छ शहर, सुंदर शहरचा नारा दिला जात असला तरी प्रत्यक्षात काही भागात साचलेले गटाराचे पाणी नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे. शहरातील झमझम कॉलनी परिसरात नाली बंद करून त्यावर सिमेंट काँक्रीट टाकल्यामुळे सांडपाणी पुढे न जाता एका मोकळ्या प्लॉटमध्ये सोडल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणावर गटाराचे पाणी साचल्याने दुर्गंधी वाढली असून डासांचा प्रादुर्भावही वाढत आहे. त्यामुळे डेंग्यूसह विविध संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः घरांच्या परिसरात साचलेल्या या दूषित पाण्यामुळे स्थानिक रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी संबंधितांना अनेकदा विनंती करूनही गटाराचे पाणी मोकळ्या प्लॉटमध्ये सोडणे बंद झाले नसून सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या मोकळ्या जागेत गटाराचे अधिकच पाणी साचत असून



यापासून आरोग्य धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याप्रकरणी परिसरातील रहिवासी आनंद वीर यांनी बीड नगरपालिकेकडे लेखी तक्रार देऊन मोकळ्या प्लॉटमध्ये गटाराचे पाणी सोडलेले तात्काळ बंद करून तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

साचलेल्या पाण्यात मोकाट जनावरे, कुत्रे बसत असून परिसर अस्वच्छ बनला आहे. मागील आठवड्यात या गटाराच्या पाण्यात एका जनावराच्या पिल्लाचा मृत्यू झाल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन मोकळ्या जागेत सोडले जाणारे गटाराचे पाणी बंद करावे, संबंधितांवर कारवाई करावी तसेच परिसराची स्वच्छता करून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# माणुसकीचा निस्वार्थ आरोग्यद्युत मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून संकेत सानप यांचा सेवा यज्ञ

**संगमनेर । प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी जगात जिथे माणूस माणसापासून दुरावत चालला आहे तिथे काही व्यक्ती आपल्या कर्तृत्व आणि सामाजिक जाणीव यांनी माणुसकीची ज्योत ज्वलंत ठेवत आहेत. संगमनेर तालुक्यातील आदर्श ते गावचे सुपुत्र आणि सध्या मुंबई ठाणे येथे रहिवासी असलेले श्री संकेत सुमन तुकाराम सानप हे अशाच एका निस्वार्थ सेवेचे नाव बनले आहे त्यांच्या याच अतुलनीय कार्याची दखल घेत सक्षम पोलीस टाइम्स राज्यस्तरीय सक्षमरत्न २०२६ आरोग्य उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना नाशिक येथे गौरविण्यात आले हे अशाच एका निस्वार्थ सेवेचे नाव संकेत सुमन तुकाराम सानप हे बनले आहे.

त्यांच्या ह्याच कार्याची दखल घेत सक्षम पोलीस टाईम यांनी संकट काळातील रुग्णांसाठी दावून जाणारा देव आरोग्य हीच खरी संपत्ती असली तरी गरिबीमुळे अनेकांना गंभीर आजारावर उपचार करणे अशक्य होते अशावेळी सरकार योजना आणि रुग्ण यांच्यातील दुवा बनण्याचे कठीण काम संकेत तुकाराम सानप यांनी स्वीकारले आहे. केवळ शब्दांची सेवा न करता प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आजवर १०० पेक्षा अधिक रुग्णांना आर्थिक




मदत मिळवून दिली आहे साधारण हॉस्पिटलच्या खाटावर मृत्यूची झुंज देत असतो आणि कुटुंबाकडे उपचारासाठी पैसे नसतात तेव्हा संकेत तुकाराम सानप त्यांच्यासाठी आरोग्य दूध म्हणून उभे राहतात कागदपत्रांची जुळवा जुळव करण्यापासून ते प्रत्यक्ष निधी मंजूर होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा केवळ प्रशासकीय नसून त्याच्यामागे मार्मिक सामाजिक गोड आणि आदर्श गाव ते ठाणे जिल्हा एक सेवाभावी प्रवास अहिल्यानगर जिल्ह्यातील मातीतील शेतकरी कुटुंबातील संस्कार घेऊन मुंबई ठाण्यासारख्या महानरात स्थायिक होत यांनी आपल्या ग्रामीण भागातील मातीशी मुळाशी आणि सामाजिक बांधिलकीशी नाते जोडलेले पहायला मिळते त्यांनी नाते तोडले नाहीत उलट आपल्या संपर्काचा आणि अनुभवाचा वापर त्यांनी समाजातील शेवटच्या घटका साठी केला गरीब गरजू कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पासून त्यांना आरोग्य आणि आरोग्याचे नवजीवन देणे हे कोणताही मोठ्या पुरस्कार पेक्षा श्रेष्ठ कार्य आहे.

संकेत यांच्या सारख्या निस्वार्थ भावनेने तात्काळ मदत मिळवून देणारा अवलिया तयार होण काळाची गरज आहे या कार्याची दखल घेत सिंदखेड राजा आमदार मनोज कायंदे, नाशिक पदवीधर आमदार सत्यजित दादा तांबे, बाळासाहेब थोरात, धनंजय मुंडे, राज्यमंत्री गोविंदराव केंद्रे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार निलेश लंके, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सुजय दादा विखे पाटील, आमदार अमोल खताळ व्यक्ती नी पत्र व्यवहार च्या माध्यमातून संकेत सानप यांच्या पाठिवर कौतुकाची थाप दिली आहे.

# परळीत कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा-महादेव गंगणे पाटील

## गुन्हेगारांच्या दहशतीखाली शहर, पोलीस प्रशासन नेमके करतेय तरी काय?; खून, मारामाऱ्या, टोळक्यांचा उच्छाद, नागरिकांमध्ये भीतीचे सावट

**परळी । प्रतिनिधी**

एकेकाळी शांत आणि सुसंस्कृत शहर म्हणून ओळख असलेल्या परळी शहराची ओळख आता दिवसेंदिवस वाढत्या गुन्हेगारीमुळे मलिन होत चालली आहे. शहरात गेल्या काही महिन्यांपासून खून, जीवघेणे हल्ले, टोळीयुद्ध, सार्वजनिक ठिकाणी मारामाऱ्या, दहशत निर्माण करणाऱ्या घटना आणि कायद्याला खुलेआम आव्हान देणारे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे परळीतील सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परळी शहरात कायदा संस्थेचे तीन तेरा झाले असून पोलीस प्रशासनाचा कसलेही प्रकारचा धाक उरला नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढले आहे. या बाबत आपण लवकरच बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदन देणार असल्याचेही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गुन्हेगारीच्या घटना घडूनही संबंधितांवर कठोर आणि धाक निर्माण करणारी कारवाई होताना दिसत नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत असल्याची चर्चा शहरभर सुरू आहे. कायद्याचा धाक उरला नसल्यामुळे गुन्हेगार भररस्त्यात, चौकाचौकात आणि सार्वजनिक ठिकाणी बिनधास्तपणे मारामाऱ्या करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे परळीत कायद्याचे राज्य आहे की गुन्हेगारांचे? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.



**सीसीटीव्ही कॅमेरे शोभेपुरतेच का?**

परळी शहरात विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. गुन्हे रोखण्यासाठी आणि आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यासाठी ही यंत्रणा उभारण्यात आली. मात्र प्रत्यक्षात गुन्हे घडल्यानंतरही त्याचा अपेक्षित उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक घटनांमध्ये आरोपींची दहशत कायम राहते, तर नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे सीसीटीव्ही यंत्रणा केवळ कागदोपत्री आणि दिखाव्यासाठीच आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**सर्वसामान्य नागरिक भयभीत**

शहरातील व्यापारी, व्यावसायिक, महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यात वाढत्या गुन्हेगारीमुळे चिंतेचे वातावरण आहे. रात्री उशिरा तर सोडाच, दिवसा देखील अनेक भागांमध्ये नागरिक असुरक्षित वाटत असल्याचे बोलले जात आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेकडून अधिक प्रभावी भूमिका अपेक्षित असताना गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

**पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह?**

शहरात सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गुन्हेगारांवर वेळेत आणि कठोर कारवाई झाली असती तर परिस्थिती एवढी बिघडली नसती, असे मत अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. प्रतिबंधात्मक उपाययोजना, नियमित गस्त, संशयितांवर लक्ष आणि गुन्हेगारांवर धडक कारवाई यांचा अभाव जाणवत असल्याची भावना व्यक्त होत आहे. परळीतील बिघडलेल्या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी प्रशासनावर थेट निशाणा साधला आहे. शहरातील वाढती गुन्हेगारी ही अत्यंत गंभीर बाब असून याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

परळी शहरात नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती उरलेली दिसत नाही. ही परिस्थिती तातडीने बदलली नाही तर येणाऱ्या काळात सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण होईल. गेल्या काही महिन्यात घडलेल्या घटनांनी व्यापारी व नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**एसपी आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

परळीतील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न आता जिल्हास्तरावर मांडण्याचा निर्णय घेण्यात आला असून लवकरच बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

**प्रशासन जागे होणार कधी?**

दररोज घडणाऱ्या घटनांमुळे परळीकरांच्या मनात भीती आणि अस्वस्थता वाढत आहे. गुन्हेगारांचे धैर्य वाढत असताना प्रशासन मात्र परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे. त्यामुळे आता तरी पोलीस प्रशासनाने धडक मोहीम राबवून गुन्हेगारीला आळा घालावा, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते, अशी चर्चा शहरात सुरू आहे. परळीकरांना सुरक्षित वातावरण देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रशासनाने तत्काळ कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

## आयुष्मान भारत महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदावरून वाद; ओमप्रकाश शेटे यांच्यावर दिशाभूल केल्याचा आरोप

**बीड । प्रतिनिधी**

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदावर ओमप्रकाश शेटे यांच्या नियुक्तीची प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, या नियुक्तीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते शुभम शिंदे आणि राजेंद्र नवले यांनी शेटे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाची दिशाभूल केल्याचा आरोप करत मूळ कागदपत्रांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

ओमप्रकाश शेटे यांची यापूर्वी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या कक्ष प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. या नियुक्तीसोबत शासनाच्या धोरणानुसार मानधन व इतर सोयी-सुविधांचाही उल्लेख करण्यात आला होता. दरम्यान, २० मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३१ वाजता आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार संबंधित फाईलवर टिपणी काढण्यात आली. या टिपणीत आरोग्य विभागाचे



सहसचिव अशोक अत्राम यांनी ओमप्रकाश शेटे यांची समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्याबाबत नमूद केल्याची माहिती समोर आली आहे. याच दिवशी दुपारी ३.२४ वाजता ही फाईल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या कार्यालयात सादर करण्यात आली. मात्र, आरोग्यमंत्र्यांनी या फाईलवर स्वाक्षरी केल्याची नोंद नसल्याचा दावा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, त्यानंतर अवघ्या सहा मिनिटांत म्हणजे दुपारी ३.३० वाजता हीच फाईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीसह मंजूर झाल्याचे दस्तावेजांमधून समोर आल्याचे सांगितले जात आहे. एकाच दिवशी टिपणी झालेल्या फाईलवर इतक्या कमी वेळात अंतिम आदेश निघाल्याने नियुक्ती प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. आरोग्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीशिवाय फाईल थेट मुख्यमंत्र्यांकडे कशी पोहोचली आणि मंजुरी कशी मिळाली, याबाबत विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संपूर्ण प्रकरणात ओमप्रकाश शेटे आणि आरोग्य विभाग वादाच्या केंद्रस्थानी आले असून, माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मूळ दस्तावेजांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित नियुक्ती प्रक्रियेत कोणताही नियमभंग अथवा दिशाभूल झाली असल्यास जबाबदारांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, आता शासन आणि आरोग्य विभाग यावर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**ॲड. राजेंद्र नवले, माहिती अधिकार कार्यकर्ते**

## पाटोदा-मांजरसुंबा मार्गावरील भेगा व ग्रामीण रुग्णालय ते भाकरे वस्ती अप्रोच रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा
## टोल वसुली करूनही दुर्लक्ष का? : गणेश बामदळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा-मांजरसुंबा मार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याला भेगा पडल्या असून वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच हायवेपासून ग्रामीण रुग्णालय व भाकरे वस्तीला जोडणाऱ्या अप्रोच रस्त्याचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने, रुग्णवाहिका व नागरिकांची ये-जा होत असताना संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.






सामाजिक कार्यकर्ते गणेश बामदळे यांनी या रस्त्यावरील भेगा व अप्रोच रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधत तात्काळ दुरुस्तीची मागणी केली आहे. या मार्गावर वाहनधारकांकडून नियमितपणे टोल वसूल केला जात असताना रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

टोल वसुलीचा उद्देश रस्त्यांची देखभाल, सुरक्षितता आणि दर्जा टिकवून ठेवणे हा असताना प्रत्यक्षात रस्त्यांवर भेगा पडणे आणि अप्रोच रस्ते खराब होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असून अपघातांचा धोका वाढला आहे.

संबंधित टोल व्यवस्थापन कंपनी व प्रशासनाने तातडीने पाहणी करून रस्त्यावरील भेगा बुजविणे आणि ग्रामीण रुग्णालय ते भाकरे वस्ती अप्रोच रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी गणेश बामदळे यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## नागसेन बुद्धविहारात बुद्ध वंदना संपन्न; प्रा.डॉ. संतोष आवचार यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

नागसेन बुद्धविहार येथे रविवार दि.०७ जून २०२६ रोजी नियमित बुद्ध वंदना कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात आवचार दांपत्य यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. बुद्ध वंदनेनंतर आयु. डी. जी. वानखेडे यांनी येत्या २६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांची १५२ वी जयंती सार्वजनिक स्वरूपात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच जयंती उत्सवासाठी अपेक्षित खर्चाबाबत उपस्थितांना अवगत करून सर्वांनी यथाशक्ती धम्मदान देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी नागसेन बुद्धविहार परिसरातील उपासक प्रा. डॉ. संतोष आवचार यांची उपप्राचार्यपदी पदोन्नती झाल्याबद्दल उपस्थित उपासक-उपासिकांच्या वतीने त्यांचा सहृदय सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आयु. एस. ए. सोनवणे, प्रा. व्ही. आर. गाडे, ड. के. आर. गाडे व उमाजी वाघमारे यांनी प्रा. डॉ. आवचार यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना प्रा. डॉ. संतोष आवचार यांनी सर्वांचे आभार मानत मिळालेल्या सन्मानामुळे समाजकार्य व शैक्षणिक क्षेत्रातील जबाबदारी अधिक वाढल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाची सांगता त्रिशरण, पंचशील व शरनातयने करण्यात आली.

## गेवराई ते त्रंबकेश्वर नवीन बसचा प्रवासी ग्राहकांनी लाभ घ्यावा : अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील व गेवराई तालुक्यातील गेवराई येथून बसणाऱ्या सर्व प्रवासी ग्राहक व भाविक भक्तांना आनंदाची बातमी आहे की, गेवराई बस स्थानक येथून नवीनच बस सेवा उपलब्ध होत आहे सदरील बस गेवराई बस स्थानक मधून दुपारी (१३:३०) वाजता सुटणार आहे याची नोंद घ्यावी.

गेवराई बस स्थानक जाणाऱ्या प्रवासी ग्राहकासाठी त्र्यंबकेश्वर, नाशिक, सिन्नर, श्रीरामपूर, शेवगाव येथे जाणाऱ्या सर्व प्रवासी ग्राहकासाठी सरळ सेवा उपलब्ध झाल्यामुळे आनंदाची व उत्साहाची बातमी आहे. तरी या बस सेवेचा जास्तीत जास्त प्रवासी ग्राहकाने लाभ घ्यावा. यामध्ये ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी वृंद, दिव्यांग जाणार, येणाऱ्या प्रवासी ग्राहकांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. तसेच त्र्यंबकेश्वर येथे जाणाऱ्या भाविक भक्त धार्मिक विधी करणाऱ्या भक्तांना याचा लाभ मोठ्या प्रमाणात होणार आहे.

जिल्ह्यात गेवराई बस स्थानक सुंदर, स्वच्छ, सुरक्षित होत आहे. तरी नवीन बसचा त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे जाण्यासाठी प्रवासी ग्राहकांनी जास्तीत जास्त वापर करण्यात यावा. तसेच वृक्ष लागवडीसाठी व इतर कार्यासाठी बस स्थानक सुबक करण्यासाठी व इतर कार्यासाठी गेवराई शहरातील विविध संघटना, प्रतिनिधी दानशूर व्यक्ती यांनी सहकार्य करावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे व आगार प्रमुख डेपो मॅनेजर लक्ष्मण मस्के गेवराई ग्राहक पंचायत तालुका अध्यक्ष प्रा. भानुदास फलके, पत्रकार शुभम घोडके ग्राहक पंचायत पदाधिकारी आदींनी केले आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एक पेड माँ के नाम अंतर्गत वृक्षारोपण

**पाटोदा । प्रतिनिधी**

वनपरिक्षेत्र कार्यालय, सामाजिक वनीकरण पाटोदा यांच्या वतीने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विभागीय वनाधिकारी (सामाजिक वनीकरण विभाग, बीड) श्री. लखमावाड साहेब तसेच सहाय्यक वनसंरक्षक श्री. बिराजदार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

शासनाच्या 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत धस पिंपळगाव येथील माध्यमिक विद्यालय तसेच निरगुडी येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण व्हावी आणि वृक्षांचे महत्त्व पटवून द्यावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सामाजिक वनीकरण पाटोदा विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी बी. पी. मोहळकर, वनरक्षक एस. एस. बडगे,




सी. एन. फरताळे, गायकवाड तसेच इतर कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध सावलीदार, फळझाडे आणि पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड केली. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि तापमानवाढ यांसारख्या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले.

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावण्याचा आणि त्याचे जतन करण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला नवे बळ मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेतली आणि पर्यावरण रक्षणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

### भीमराव आंबेडकर व आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत
## उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषदेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : पुरुषोत्तम वीर

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि बहुजन समाजाच्या एकतेच्या प्रश्नावर आयोजित करण्यात आलेल्या उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषद या महत्त्वपूर्ण परिषदेस बहुजन समाजातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने मराठवाड्यातील जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम (गोटू) वीर यांनी केले आहे. ही परिषद दि. ०७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता तापडिया नाट्य मंदिर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर तसेच रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती







लाभणार आहे.

देशभरात अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरणाचा मुद्दा चर्चेत असताना बहुजन समाजाच्या हक्कांवर गदा येऊ नये आणि संविधानिक अधिकारांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने या संघर्ष परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत उपवर्गीकरणाच्या परिणामांवर सखोल चर्चा होणार असून समाजाच्या भविष्यासंदर्भात महत्त्वपूर्ण दिशा ठरविण्यात येणार आहे.

यावेळी डॉ. भिमराव आंबेडकर आणि सरसेनानी आनंदराज आंबेडकर हे समाजबांधवांना मार्गदर्शन करणार असून सामाजिक, राजकीय आणि संविधानिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडणार आहेत. त्यामुळे बहुजन समाजातील युवक, विद्यार्थी, महिला, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून आयोजित करण्यात आलेली ही परिषद बहुजन समाजाच्या एकजुटीचे प्रतीक ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.उपवर्गीकरण होऊ देणार नाही.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची विटंबना थांबवा : स्मारकाचे पावित्र्य राखा : दत्ता कांबळे

### राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन : बांधकामची चौकशीची मागणी

**माजलगाव । शेख अखिल**

माजलगाव शहराच्या मध्यभागी नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले होते. सदरील समारकाच्या चौथाऱ्याची दुरावस्था झाल्याने राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.




नवीन बस थांबाच्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे काम सुरु असून, स्मारकाच्या चौथाऱ्याचे काम पूर्ण झालेलं असून, सदरील चौथाऱ्याच्या कामात अर्थपूर्ण भ्रस्टाचार झालेला असून, निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात आल्यामुळे सदरील चौथाऱ्याच्या बांधकाम वरील फरशी गळून पडली आहे, त्याच्यामुळे गुत्तेदार यांची चौकशी करून योग्य ती फौजदारी कार्यवाही करण्यात यावी तसेच आजू बाजूचा परिसर दुर्गंधी युक्त झाल्याने व नगरपरिषद व एस.टी. परिवहन महामंडळ प्रशासन यांच्या हलगर्जी पणा मुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची वारंवार विटंबना होत असून, ही विटंबना तात्काळ थांबवाण्यात यावी तसेच स्मारक परिसरात कायम स्वच्छता करून स्मारकास दिवस रात्र पाळीत संरक्षण देण्यासाठी नगरपरिषदने कायम कर्मचारी देण्यात यावे अन्यथा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी निवेदणाद्वारे उपविभागीय अधिकारी यांना दिला असून, नागरिकांना स्मारकाचे पावित्र्य राखण्याचे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे. यावेळी तालुकाध्यक्ष दत्ता कांबळे सह वरिष्ठ उपाध्यक्ष महावीर मस्के, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, अशोक कांबळे, अहेमद शेख, किसन लोखंडे, विठ्ठल कांबळे, कल्याण भारस्कर, जाणूशाह शेख, करामा अनसारी, पप्पू कसबे, फारुख शेख, आदित्य कांबळे, धुराजी कांबळे, दिगांबर कांबळे आदी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्येष्ठ मुक्त पत्रकार एस.एम. युसूफ यांना प्रतिष्ठित राज्यस्तरीय ऑल टाईम बेस्ट रिपोर्टर गौरव पुरस्कार जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या लेखणीच्या जोरावर गेल्या १५ वर्षांपासून पत्रकारितेत अविरत सेवा बजावणारे आणि बीडमधील स्थानिक समस्यांसाठी थेट रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे मुक्त पत्रकार एस. एम. युसूफ यांना यंदाचा अत्यंत मानाचा आणि प्रतिष्ठित राज्यस्तरीय ऑल टाईम बेस्ट रिपोर्टर सर्वोत्कृष्ट मुक्त पत्रकार जीवनगौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या वतीने या सर्वोच्च सन्मानाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र'तर्फे पत्रकारिता, समाजकारण आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या खऱ्या लढवय्यांचा व गुणवंतांचा गौरव केला जातो. यंदाच्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने एस. एम. युसूफ यांच्या गेल्या दीड दशकातील निर्भीड पत्रकारितेची आणि आगळ्यावेगळ्या जनआंदोलनांची दखल घेऊन या मानाच्या पुरस्कारासाठी त्यांची एकमुखाने निवड केली आहे.



एस.एम. युसूफ हे केवळ बातम्या लिहिणारे पत्रकार नसून, समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारे एक संवेदनशील आणि धडाडीचे व्यक्तिमत्त्व आहेत. गेल्या १५ वर्षांपासून मुक्त पत्रकार म्हणून काम करताना त्यांनी नेहमीच शोषित, वंचित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या बाजूने आपली लेखणी चालवली आहे. प्रशासकीय अनास्था आणि लोकहितैषी कामांमधील दिरंगाई यांविरुद्ध त्यांचा आवाज नेहमीच बुलंद राहिला आहे.एस. एम. युसूफ यांच्या आंदोलनाचा बाणा अत्यंत अनोखा आणि प्रशासनाचे डोळे उघडून त्यांना हादरवून सोडणारा आहे. बशीरगंज ते जिल्हा रुग्णालय हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षांपासून अतिशय दुरवस्थेत, खितपत पडला होता. या रस्त्याच्या निर्मितीसाठी त्यांनी अवघ्या एका वर्षात प्रशासनाविरुद्ध 'व्यंगात्मक निषेध आंदोलन', 'भीक मांगो आंदोलन' आणि थेट रस्त्यावरील खड्ड्यात 'बेशरम अंघोळ आंदोलन' करून प्रशासनाला हा रस्ता चांगला तयार करण्यास भाग पाडले. त्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळेच आज हा रस्ता दिमाखात उभा आहे.शहराची मुख्य ओळख असलेले ऐतिहासिक 'कारंजा टॉवर' अत्यंत दुरवस्थेत गेले होते. ही दुरवस्थता पाहून युसूफ यांनी आपल्या लेखणीतून बीड नगरपालिका, मी कारंजा टॉवर बोलतोय... हा अत्यंत मर्मभेदी व तडफदार लेख लिहिला, ज्याची दखल प्रशासनाला घ्यावी लागली आणि कारंजा टॉवरचा कायापालट झाला. याशिवाय, 'खासबाग ते मोमीनपुरा' या दोन्ही भागांना जोडण्यासाठी पूल तयार व्हावा, म्हणून ते दरवर्षी न चुकता नदीच्या पात्रात 'डुबकी लगाव आंदोलन' करतात. शहरातील प्रत्येक सामाजिक आंदोलनात आणि नागरिकांच्या हक्काच्या लढ्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

२० जून रोजी भव्य सोहळ्यात वितरण

हा दिमाखदार आणि गौरवशाली पुरस्कार वितरण सोहळा येत्या शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गज व मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याच गरिमामयी उपस्थितीत एस. एम. युसूफ यांच्या १५ वर्षांच्या तपस्येचा आणि संघर्षाचा विशेष गौरव करण्यात येईल.

एस. एम. युसूफ यांनी गेल्या १५ वर्षांत बीडमध्ये पत्रकारितेचा एक नवा मापदंड निर्माण केला आहे. केवळ वृत्त गोळा करणे इतकेच मर्यादित न ठेवता, खासबाग ते मोमीनपुरा पुलाच्या निर्मितीसाठी दरवर्षी स्वतः पाण्यात 'डुबकी लगाव' आंदोलन करून त्यांनी जनसामान्यांच्या संघर्षाला आपली लेखणी अर्पण केली आहे. अशा खऱ्या, निर्भीड आणि 'ऑल टाईम बेस्ट' पत्रकाराचा सन्मान करताना युवा लोकमित्र परिवाराला सार्थ अभिमान वाटत आहे.

**शेख ताहेर जाफर (संपादक, साप्ताहिक युवा लोकमित्र, बीड)**

# बीड वक्फ बोर्डात महाघोटाळा; अध्यक्ष समीर काझींवर पदाच्या गैरवापराचे गंभीर आरोप!

## बीड वक्फ बोर्डावरून 'उर्दू' गायब; अध्यक्ष समीर काझींना उर्दू भाषेची लर्जी आहे का?

**कर्तव्यदक्ष अरसलान शेख यांची बदली; वादग्रस्त तौफिक अहमद यांच्या हाती धुरा का?**

**गॅरेज लाईनमध्ये वक्फ बोर्डाचे कार्यालय; अध्यक्ष समीर काझींचा हा कोणता तुघलकी कारभार?**

**जनतेच्या सोयी वाऱ्यावर, लाचखोरीला रान मोकळे; वक्फ कार्यालयाचे स्थलांतर कुणाच्या फायद्यासाठी?**

**लेखा विभागातील 'कनिष्ठ सहाय्यक' वक्फचा सूत्रधार? प्रतिनियुक्ती संशयाच्या भोवऱ्यात**

**बीड । विश्वनायक न्यूज**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या मनमानी आणि संशयास्पद कारभारामुळे बीड जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. आपल्या पदाचा आणि अधिकाराचा उघड-उघड गैरवापर करून, केवळ आपल्या निकटवर्तीयांना आणि नातेवाईकांना आर्थिक लाभ पोहोचवण्यासाठीच जिल्हा वक्फ कार्यालयाचे स्थलांतर केल्याचा खळबळजनक आरोप आता थेट नागरिकांमधून होऊ लागला आहे. सर्वसामान्यांच्या हक्काचे कार्यालय एका काळ्या कोपऱ्यात ढकलून तिथे लाचखोरी आणि अपारदर्शकतेला खतपाणी घातले जात असल्याचा गंभीर संशय आता व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा वक्फ कार्यालय सुरुवातीला किल्ला मैदान परिसरात चालत होते. त्यानंतर ते आसिफ नगर येथे स्थलांतरित करण्यात आले. आसिफ नगर परिसर




हा शहराचा मध्यवर्ती भाग असून तिथे टायपिंग, झेरॉक्स, दस्तऐवज आणि नोटरी अशा सर्व शासकीय सोयी-सुविधा नागरिकांच्या हाताशी होत्या. मग अचानक असं काय घडलं की अध्यक्ष समीर काझी यांनी चालते-बोलते कार्यालय जालना रोडवरील 'अल्फा कॉम्प्लेक्स'मध्ये हलवण्याचा तुघलकी निर्णय घेतला? चर्चा तर अशी आहे की, ज्या इमारतीत कार्यालय हलवले गेले, ती इमारत वक्फ




मंडळातील प्रतिनियुक्तीवर असलेले पीए शेख जाहेदुल्ला यांच्या सासऱ्यांची आहे! म्हणजेच, शासकीय तिजोरीतून दरमहा लाखो रुपयांचे भाडे आपल्याच पीएच्या घरात कसे जाईल, याचा पद्धतशीर 'गेम' इथे रचला गेल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नवीन कार्यालय हे शहराच्या मुख्य वर्दळीपासून इतके दूर आणि लपलेले आहे की, नवीन अर्जदार, वक्फ संस्थांचे पदाधिकारी आणि मुतवल्ली यांना कार्यालय शोधताना नाकी नऊ येत आहेत. हेतुपुरस्सर लपवाछपवी? पूर्वीचे कार्यालय मध्यवस्तीत असल्याने तिथे सर्वांची नजर असायची, कामात पारदर्शकता होती. आता मात्र कार्यालय एका आडबाजूला नेऊन, वक्फच्या कामकाजावर पडदा टाकण्याचा आणि भ्रष्टाचाराला मोकळे रान देण्याचा हा डाव असल्याचा थेट आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. बीड नगर परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालय परिसरात टायपिंग, झेरॉक्स, दस्तऐवज आणि नोटरी अशा सर्व सोयी-सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध आहेत. या परिसरात वक्फ कार्यालयासाठी जागा सहज उपलब्ध होऊ शकत होती. तरीही नागरिकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या जागा डावलून जालना रोडवरील अल्फा कॉम्प्लेक्स इमारतीलाच का पसंती दिली गेली? याचे उत्तर अध्यक्ष समीर काझी यांनी दिले पाहिजे, अशी मागणी आता जोर धरत आहे.



### अध्यक्षांचा मनमानी कारभार; वक्फच्या बोर्डावरून उर्दू भाषाच गायब!

ज्या वक्फ बोर्डाच्या पैशांवर आणि अधिकारांवर तुम्ही खुर्च्या उबवत आहात, त्याच बोर्डावरून उर्दू गायब करताना तुम्हाला लाज वाटली नाही का? असा रोकडा सवाल बीडचे नागरिक अध्यक्ष समीर काझी यांना विचारत आहेत. या संपूर्ण प्रकरणात बीडमधील तथाकथित सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांचा दुटप्पी चेहरा आणि ढोंगीपणा चव्हाट्यावर आला आहे. बीड रेल्वे स्टेशन असो की बीड नगरपालिकेचा बोर्ड, तिथे उर्दू भाषेत नाव नाही म्हणून छाती बडवून घेणारे, मोर्चे काढणारे आणि आंदोलनांचे स्टंट करणारे नेते आता कुठे शेणखत खात बसले आहेत? वक्फ कार्यालयाच्या बोर्डावर उर्दू भाषेत नाव नसताना या स्वयंघोषित नेत्यांच्या डोळ्यात काय कुसळ गेले आहे का? त्यांना हे दिसत नाही की ते जाणीवपूर्वक याकडे डोळेझाक करत आहेत? तसेच, इतर वेळी उर्दूप्रेमाचा आव आणणारे स्थानिक नेते वक्फ अध्यक्षांच्या या भूमिकेवर मूग गिळून का गप्प आहेत? त्यांची कोणती 'सेटींग' झाली आहे? याचेही उत्तर जनतेला हवे आहे.

### वक्फ बोर्ड जनतेसाठी की मोजक्या लोकांच्या कमाईसाठी? उच्चस्तरीय चौकशी करा!

वक्फ कार्यालय हे नागरिकांच्या सेवेसाठी आहे की काही मोजक्या लोकांच्या आर्थिक फायद्यासाठी? असा संतप्त सवाल बीडचे नागरिक विचारत आहेत. वक्फ मंडळाच्या कामकाजातील पारदर्शकता परत मिळवण्यासाठी हे कार्यालय तात्काळ पुन्हा शहराच्या मध्यवर्ती भागात आणलेच पाहिजे. अध्यक्ष समीर काझी यांच्यावर झालेल्या या गंभीर आरोपांची आणि पीएच्या संशयास्पद प्रतिनियुक्तीची उच्चस्तरीय चौकशी करून, दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता बीड जिल्ह्यातून अत्यंत आक्रमकपणे केली जात आहे. आता यावर राज्य शासन काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सोयीच्या जागा डावलल्या; गॅरेज लाईनचीच पसंती का?

बीड नगर परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय (कलेक्टर ऑफिस) आणि जिल्हा न्यायालय परिसर हा शहराचा मुख्य प्रशासकीय कणा आहे. या भागात टायपिंग, झेरॉक्स, दस्तऐवज तयार करणे आणि नोटरी अशा सर्व शासकीय सोयी-सुविधा नागरिकांसाठी एकाच छताखाली उपलब्ध आहेत. वक्फ कार्यालयाशी संबंधित कामांसाठी या सर्व गोष्टी अत्यंत गरजेच्या असतात. या परिसरात वक्फ मंडळाला हवी तशी शासकीय जागा सहज उपलब्ध होऊ शकते. जालना रोड हा परिसर बीड जिल्ह्यात केवळ आणि केवळ गॅरेज लाईन म्हणून ओळखला जातो. जिथे सर्वत्र फक्त गॅरेजेस, ऑइलची आणि ऑटोमोबाईलची दुकाने आहेत, जिथे दिवसभर खटखट-फटफट आणि गोंगाट असतो, अशा अत्यंत गैरसोयीच्या आणि आडबाजूच्या ठिकाणी वक्फ बोर्डाचे कार्यालय नेण्यामागे अध्यक्ष समीर काझी आणि त्यांच्या पीएचा नेमका काय मलिदा आहे? याचे उत्तर आता काझी यांना द्यावेच लागेल!

### प्रामाणिक अधिकाऱ्याची उचलबांगडी करून मर्जीतील माणसाला आणण्यामागचे 'गौडबंगाल' काय?

बीड जिल्हा वक्फ बोर्डाला स्वतःची खाजगी जहागीर समजणाऱ्या अध्यक्ष समीर काझी यांनी जनतेला उत्तर दिले पाहिजे. प्रामाणिक अरसलान शेख यांची बदली कोणत्या निकषांवर झाली? आणि वादग्रस्त तौफिक अहमद यांना आणण्यामागे कोणती 'डीलिंग' झाली? असा संतप्त सवाल बीडचे नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.या संपूर्ण बदलीसत्राची आणि वक्फ बोर्डातील वशिलेबाजीची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अन्यथा बीडमधील आक्रमक तरुण आणि सामाजिक संघटना वक्फ कार्यालयाला टाळे ठोकून तीव्र जनआंदोलन उभारतील, असा थेट आणि आक्रमक इशारा आता प्रशासनाला देण्यात आला आहे.

## झाडे लावा-झाडे जगवा पण वाढलेली झाडे वाचविणार कोण?

### राजुरीवेस ते माळीवेस पर्यंतची अनेक झाडे तोडल्याने झाली बोडखी

**बीड । प्रतिनिधी**

पावसाळ्याचा हंगाम सुरू झाला आहे. सध्या रोहिणी नक्षत्र सुरू असून या नक्षत्रात आतापर्यंत दोन वेळेस अत्यंत तुरळक पाऊस पडला. येत्या ०७ जून पासून मृग नक्षत्रास सुरुवात होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन शहरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे आज दिनांक ०३ जून २०२६ बुधवार रोजी छाटण्यात आली. यामुळे अनेक झाडे बोडखी झाली असून झाडे लावा-झाडे जगवा हा नेहमी दिला जाणारा संदेश झाडे तोडताना पाहणाऱ्याच्या मनात आला तसेच त्यांच्या सद्सद् विवेक बुद्धीमध्ये झाडे वाचविणार कोण? असा प्रश्नही निर्माण झाल्याचे प्रतिपादन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

अवघ्या काही वर्षांपूर्वी बीड शहरातील राजुरीवेस ते बलभीम



चौक ते माळीवेस चौक या रस्त्यांवर मास्टर प्लॅन राबविण्यात आला होता. त्यानंतर बीड नगर परिषदेने कोट्यावधी रुपये खर्च करून या रस्त्यांवर दोन्ही बाजूने भारतीय सोडून विदेशी असलेली कुचकी झाडे लावली होती. वड, पिंपळ, कडूलिंब या मानवासह जनावरांकरिता अत्यंत उपयोगी असलेली शुद्ध भारतीय झाडांना वगळून विदेशी झाडे लावली. ही कुचकी असल्याने काही काळातच भरभराटीने वाढली खरी परंतु त्यांचा लाभ मात्र भारतीय झाडांसारखा नागरिकांसह जनावरांनाही होत नाहीये.

पण त्या झाडांकडून रस्त्यांवर सावली मिळत होती. हीच काय ती समाधानाची बाब. मात्र पावसाळ्याचा हंगाम लक्षात घेता रस्त्यांवरून विद्युत वाहून नेणाऱ्या तारांना या झाडांमुळे, त्यांच्या फांद्यांमुळे नुकसान होऊ नये म्हणून शहरातील या दोन्ही प्रमुख रस्त्यांवरील झाडे सपासप तोडण्यात आली. यामुळे या रस्त्यांवरील झाडे तर बोडखी झालीच परंतु त्यापासून रस्त्यांवर येणारी सावली सुद्धा आता मिळणार नाहीये. ही परिस्थिती पाहता नेहमी माणसासह जनावरांकरिता सुद्धा झाडे कशी आवश्यक आहे हे सांगून शासन-प्रशासनाकडून दरवर्षी वृक्षारोपणावर कोट्यावधी रुपयांचा चुराडा केला जातोय. त्याकरिता पैशांची उधळपट्टी करताना जागा व पुढील काळाचा विचार न करता कुठेही आणि कसेही वृक्षारोपण केले जाते. याकरिता शासन-प्रशासनाकडून आलेला निधी हा उधळला जातो की, गिळला जातो हे संबंधित यंत्रणेलाच माहीत, पण तूर्तास तरी वीज आणि पाऊस याचे कारण देऊन झाडे बोडखी करण्यात आली आहे. असे प्रतिपादन मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## अधीक्षक अभियंत्यांच्या 'त्या' कडक इशाऱ्याला बीडच्या कर्मचाऱ्यांनी दाखवली केराची टोपली!

### जनतेने केली तारेची राखण, लाईनमन मात्र घोरत पडला!

### ...तर जीवितहानीला जबाबदार कोण? बीडकरांचा संतप्त सवाल!

**बीड । प्रतिनिधी**

पावसाळ्यात निष्काळजीपणा आढळल्यास थेट घरचा रस्ता दाखवू, असा कडक इशारा महावितरणचे कर्तव्यदक्ष अधीक्षक अभियंता प्रेमसिंह राजपूत यांनी १ जून २०२६ रोजी माळीवेस उपविभाग कार्यालयतील बैठकीत अधिकाऱ्यांना दिला होता. पण साहेब, तुमच्या या आदेशाला उपविभाग माळीवेस येथील कर्मचाऱ्यांनी पार केराची टोपली दाखवल्याचे संतापजनक चित्र बीड शहरात पाहायला मिळाले आहे. अधिकाऱ्यांचे आदेश फक्त कागदावरच आणि कर्मचाऱ्यांची मुजोरी मात्र थेट जनतेच्या जीवावर उठल्याचा प्रकार समोर आला आहे. बीड शहरातील पथक क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या कागदी दरवाजा येथील जुनी मामु डीपी मधून जाणारी एल.टी. लाईनची मुख्य विद्युत तार ८ जून २०२६ रात्री १२:१० वाजण्याच्या सुमारास अचानक तुटली. ही तार तुटून थेट



हवेत लटकत होती. सर्वात भयानक बाब म्हणजे, या तुटलेल्या तारेमध्ये तब्बल ११ तास पूर्ण दाबाने विद्युत प्रवाह सुरू होता! हा चौक अत्यंत गजबजलेला असून येथून मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. रात्रीच्या वेळी सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे ती जिवंत विद्युत तार हवेत हेलकावे खात होती आणि त्यातून ठिणग्या (चिंगाऱ्या) उडत होत्या. यामुळे परिसरात कधीही मोठा अनर्थ होऊन मोठा स्फोट किंवा दुर्घटना घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. रात्री १२ वाजल्यापासून ते दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत तब्बल ११ तास ती मृत्यूचा सापळा बनलेली तार तशीच लटकत होती. स्थानिक सुजाण नागरिकांनी प्रसंगावधान राखून संबंधित लाईनमनला एकामागून एक अनेक फोन लावले. मात्र, जनतेच्या पैशांवर पगार घेणाऱ्या त्या निर्ढावलेल्या लाईनमनने नागरिकांचा एकही फोन उचलण्याची तसदी घेतली नाही.एकीकडे लाईनमन फोन बंद करून किंवा दुर्लक्ष करून घरात सुशेगात आराम करत झोपला होता, तर दुसरीकडे विद्युत धक्क्याने कोणाचा जीव जाऊ नये म्हणून स्थानिक नागरिकांना जीव मुठीत धरून रात्रभर त्या तुटलेल्या तारेची राखण करावी लागली! या निष्काळजीपणामुळे रात्रभरात एखादी मोठी जीवितहानी झाली असती, एखादा निष्पाप जीव गेला असता किंवा मोठी दुर्घटना घडली असती, तर याचा जबाबदार कोण राहिला असता? असा संतप्त सवाल आता बीडचे नागरिक विचारत आहेत. या भोंगळ कारभारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये महावितरणविरोधात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.कामचुकार कर्मचाऱ्यांना थेट घरचा रस्ता दाखवू,हा अधीक्षक अभियंता प्रेमसिंह राजपूत यांचा शब्द केवळ 'थेट इशारा' होता की त्यात खरोखरच धमक होती? हे पाहण्याची वेळ आता आली आहे. रात्रभर नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या आणि कर्तव्यात कसूर करून फोन न उचलणाऱ्या त्या मुजोर लाईनमनवर तात्काळ निलंबनाची कारवाई होणार का? राजपूत साहेब त्याला खरोखरच 'घरचा रस्ता' दाखवणार का? याकडे आता संपूर्ण बीड शहराचे लक्ष लागले आहे.

## बीड प्रशासनाच्या दाव्यांचा फुगा फुटला!

## पाणंद रस्ता वादातून महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला

**काळेगाव हवेलीतील धक्कादायक प्रकार; वेळीच कारवाई झाली असती तर घटना टळली असती**

### पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या दाव्यांवर डॉ. गणेश ढवळे यांचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा प्रशासनाकडून पाणंद रस्ते मोकळे करून शेतकऱ्यांना न्याय दिल्याचा मोठा गाजावाजा केला जात असला, तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे काळेगाव हवेली (ता. बीड) येथे घडलेल्या घटनेतून समोर आले आहे. पाणंद रस्ता मोकळा करण्याच्या कामातून निर्माण झालेल्या वादातून एका महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली.

काळेगाव हवेली येथील कुंभार वस्तीवरील गट क्रमांक ४२२ व ४२३ मधील शेतरस्ता दि. ४ जून रोजी तहसील प्रशासन व भूमी अभिलेख विभागाने मोकळा करून दिला होता. मात्र त्यावेळी काही व्यक्तींनी रस्ता कामाला विरोध करत महसूल कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा केल्याचा आरोप आहे. याबाबत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली होती. मात्र कोणतीही ठोस







कारवाई झाली नसल्याचे संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

आज दि. ७ जून रोजी सकाळी सुमारे ११.४५ वाजण्याच्या सुमारास श्यामसुंदर मोटरकर, संदीप श्यामसुंदर मोटरकर, भगवान रामभाऊ मोटरकर, बद्रीनारायण रामभाऊ मोटरकर, भागवत भगवान मोटरकर व महानंदा श्यामसुंदर मोटरकर यांनी अभिमान शेलार, नंदा शेलार व शिवशर्मा शेलार यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत श्यामसुंदर मोटरकर यांनी अभिमान शेलार यांच्यावर बटईने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता नंदा अभिमान शेलार यांनी तो वार रोखण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांच्या हाताला दुखापत झाली. जखमींना फिर्याद नोंदविण्यासाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना जिल्हा रुग्णालय, बीड येथे पाठविल्याची माहिती मिळाली आहे.

डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनावर टीका करत म्हटले की, दि. ४ जून रोजी महसूल व भूमी अभिलेख अधिकाऱ्यांसमोरच रस्ता कामाला विरोध करण्यात आला होता. त्यावेळी संबंधितांवर कारवाई झाली असती तर आजची घटना घडली नसती. शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या घोषणा केवळ कागदोपत्रीच असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या सरकारी मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## बीड येथे शिवसेना सचिव संजय मोरे यांचे उत्स्फूर्त स्वागत

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना सचिव संजय मोरे साहेब बीड येथे आले असता जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए.एस. गोलू यांची शिवसेना अल्पसंख्याक विभाग, बीड जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा संजय भाऊ मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात



आला. तसेच इरफान कुरेशी आणि सरफराज काजी यांचीही निवड झाल्याबद्दल त्यांचा संजय मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रमुख उपस्थिती शिवसेना अल्पसंख्याक कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य - समीर काजी, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, गेवराई तालुकाप्रमुख उद्धव मडके तसेच असंख्य शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.




साप्ताहिक, विश्वनायक हे पत्र, प्रकाशक, मालक, संपादक, **शेख बिलाल शेख युसूफ** यांनी मुद्रक, जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै, जि.बीड महाराष्ट्र -४३११२२ येथे छापून साप्ताहिक विश्वनायक कार्यालय, घर क्रं.१/१०/६६ खासबाग, खाजानगर, तुळजाभवानी मंदिर जवळ, ता,जि, बीड, महाराष्ट्र -४३११२२ येथे प्रकाशित केले, **(साप्ताहिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही. *वाद विवाद जिल्हा न्यायालया अंतर्गत)** मो. 8686888898
ई-मेल- vishvanayak94@gmail.com

The weekly newspaper, Vishvanayak, is published by its publisher, owner, and editor, Sheikh Bilal Sheikh Yusuf. It is printed at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vaijnath, Taluka Parli Vaijnath, District Beed, Maharashtra - 431122, and published from the Vishvanayak Weekly office, House no,1/10/66,Khasbag, Khajanagar, near Tuljabhavani Temple, Taluka & District Beed, Maharashtra - 431122. (The editor may not necessarily agree with the content and news in the weekly publication.*Disputes are subject to the jurisdiction of the district court) Mobile: 8686888898 - Email: vishvanayak94@gmail.com